**फिर्यादी जालींदर जनाजी नरसाळे यांचा पुढील सरतपास विधीज्ञ श्री. पी.डी.म्हस्के यांचे मार्फत शपथेवर सुरु** –

०१. प्रस्तुत प्रकरणात माझे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. त्यातील मजकुर माझे सांगणेप्रमाणे लिहीण्यात आला. त्यावर मी वाचुन सही केली. त्यातील मजकुर बरोबर आहे.

०२. आता मला यादी क्र.३/१ वरिल ठराव दाखविला. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी व चेअरमन यांच्या सहया आहेत. त्याला **नि.२०** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/२ वरिल धनादेश दाखविला. त्यावर आरोपीची सही आहे. ती मी ओळखतो. त्याला **नि.२१** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/३ वरिल रिटर्न मेमो दाखविला. त्यावर बँकेच्या शाखाधिकारी यांची सही व बँकेचा शिक्का आहे. ती मी ओळखतो. त्याला **नि.२२** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/४ वरिल धनादेश बँकेत भरल्याची पावती दाखविली. त्याला **नि.२३** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/५ वरिल स्थळप्रत नोटीस दाखविली. त्यावर माझ्या विधीज्ञांची सही आहे. त्याला **नि.२४** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/६ वरिल पोस्टाची आर एल पावती दाखविली. त्याला **नि.२४अ** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/७ वरिल पोस्टाची पोहोच पावती दाखविली. त्याला **नि.२५** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/८ वरिल कर्ज मागणी अर्ज दाखविला. त्यावर आरोपीची सही आहे. त्याला **नि.२६** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/९ वरिल कर्जरोखा दाखविला. त्याला **नि.२७** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/१० वरिल वचनचिठ्ठी दाखविली. त्यावर आरोपीची व जामीनदारांच्या सहया आहेत. त्याला **नि.२८** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/११ वरिल खाते उतारा दाखविला. त्यावर शाखाधिकारी यांची सही व बँकेचा शिक्का आहे. मी त्यांची सही ओळखतो. त्यास एकत्रीत **नि.२९**

देण्यात आली. आता मला यादी क्र.३/१२ वरिल ६५ब चे प्रमापणपत्र दाखविले. त्यावर शाखाधिकारी यांची सही व बँकेचा शिक्का आहे. मी त्यांची सही ओळखतो. त्यास एकत्रीत **नि.३०** देण्यात आली.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

साक्षीदाराचा जबाब नोंदवितांना डायसलगतचे स्क्रीन व भिंतीवरील स्क्रीन चालु केले होते व त्यांचे समक्ष संगणकावर साक्ष नोंदवण्यात आली.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

जबाब माझे समक्ष व उपस्थितीत नोंदवला.

सही/-

( माधुरी रा. खनवे )

दिनांक ३०/०७/२०२५ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

कोर्ट नं.०७, अहमदनगर